सकाळ

### रायफल शूटिंग, आर्चरी, जिम्नॅस्टिक्सची सुविधा

# ऐतिहासिक कामगार क्रीडा भवनाचा कायापालट

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १७ : कामगारांच्या सर्वांगीण विकासासाठी ५० वर्षांपासून कार्यरत असलेले कामगार क्रीडा भवन आता कात टाकत आहे. या क्रीडा भवनातील जलतरण तलाव, बॅडमिंटन कोर्ट, टेबल टेनिस कोर्ट, व्यायामशाळा अशा क्रीडा सुविधांचे आधुनिकीकरण करण्यासोबतच आता रायफल शूटिंग, आर्चरी, जिम्नॅस्टिक्सची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

प्रभादेवी येथील कामगार क्रीडा भवनाचे गिरणगाव व परिसरातील कामगार आणि सर्वसामान्यांच्या जीवणात एक अविस्मरणीय स्थान आहे. या कामगार क्रीडा भवनाची उभारणी १९७० च्या दशकात करण्यात आली असून ही इमारत ५० वर्षांपेक्षा अधिक जुनी आहे. तत्कालीन राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते या वास्तूचे उद्घाटन करण्यात आले होते. मंडळाचे विद्यमान कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी हा पदभार स्वीकारल्यानंतर मंडळाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याचे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा देणगीदाराच्या मदतीने आणि शासनाच्या इतर विभागांच्या विविध योजनांच्या समन्वयातून या वास्तूचा कायापालट करण्याचे प्रयत्न सुरू केले. सुरुवातीला सनदी लेखापाल रवी गुलगुले यांनी देणगी स्वरूपात भवनातील अभ्यासिकेचे आधुनिकीकरण करून दिले. तसेच या कामगार क्रीडा भवनाची संरक्षक भिंत जीर्ण होऊन काही ठिकाणी पडली होती. मुंबई शहर जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ही भिंत बांधून घेण्यात मंडळ प्रशासनाला यश आले. क्रीडा भवनाच्या शेजारी सुमारे १०-११ वर्षांपूर्वी नव्याने बांधण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यात पावसाचे पाणी साचत होते. समस्या सोडविण्यासाठी भूगर्भशास्त्रज्ञ डॉ. धनंजय येडेकर यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. तसेच याच तळमजल्यावर आता अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त रायफल शूटिंग रेंज उभी राहिलेली आहे.

मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री सुरेश केसरकर, कामगार मंत्री सुरेश खाडे, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल यांच्या मंडळ प्रशासनाला मिळालेल्या पाठबळामुळे हुतात्मा बाबू गेनू कामगार क्रीडा भवन आता नव्या अत्याधुनिक सुविधांसह दिमाखात उभे राहत आहे. मुंबई शहर जिल्ह्याचे तत्कालिन जिल्हाधिकारी राजीव निवतकर आणि विद्यमान जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांचे देखील यात सहकार्य मिळत आहे.



मुंबई : कामगार क्रीडा भवनात रायफल शूटिंगची रेंज सुरू करण्यात आली आहे.

## नूतनीकरण अंतिम टप्प्यात

कामगार क्रीडा भवनातील विविध क्रीडा सुविधांचेदेखील नूतनीकरण करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. येथे जलतरण तलाव, वुडन बॅडमिंटन कोर्ट, टेबल टेनिस कोर्ट, व्यायामशाळा, अभ्यासिका, ग्रंथालय, शिवण प्रशिक्षण वर्ग, बालवाडी, खुला रंगमंच आदी सुविधा आहेत. तसेच जलतरण तलावाचे आधुनिकीकरण करण्यात येत त्यावर आकर्षक असे टेन्साईल रूफ (छत) बसवून घेण्यात येत आहे. क्रीडा भवनाच्या दुसऱ्या मजल्यावर कलादालन (आर्ट गॅलरी) सुविधा उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न आहे.

## केंद्रात या आहेत सुविधा

कामगार मैदानात १० मीटर रायफल शूटिंग रेंज, ७० मीटर आर्चरी रेंज या सुविधा उपलब्ध आहेत. यात १० मीटर रायफल शूटिंग रेंजमध्ये १५ खेळाडू सराव करू शकतात. तसेच १५ मॅन्युअल टार्गेट लेनसह ८ कंप्युटराज्ड टार्गेट सिस्टिम्स या रेंजमध्ये आहेत. तसेच भारतीय आणि परदेशी बनावटीच्या अत्याधुनिक एअर गन येथे उपलब्ध आहेत. तसेच ७० मीटर आर्चरी प्रशिक्षण रेंजदेखील आहे. यात एकाच वेळी २१ खेळाडूंना सराव करू शकताता. भारतीय व परदेशी बनावटीचे अत्याधुनिक साहित्य येथे उपलब्ध आहे.

शासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून त्यांच्याकडील योजनांच्या तरतुदींमधून सुविधा तयार करून देण्याची विनंती केली. पालकमंत्री, जिल्हा नियोजन समिती, क्रीडा विभाग तसेच युनिसेफसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांचेदेखील सहकार्य मिळत आहे.

- रविराज इळवे,
कामगार कल्याण आयुक्त

जुन्या वाचनालयाचा कायापालट झाला आहे. बैठक व्यवस्थेसह चार्जिंग सुविधा, आवश्यक लाईट्स सुविधेत सुधारणा झाली आहे. याशिवाय वाचनालयाची वेळ वाढवून दिल्याने विद्यार्थ्यांना याचा अधिक फायदा होत आहे.

- राहुल आनंद,
एमपीएससी अभ्यासक